दिनांक १६/०२/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवकश्री. अप्पासाहेब मुरलीधर गोराडे, पद- मंडळ अधिकारी, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी ५००००/- रु लाचेची मागणी केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव, हुद्दा | :- | श्री. अप्पासाहेब मुरलीधर गोराडे, पद- मंडळ अधिकारी, चिकलठाणा, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५०,०००/- रु लाचेची मागणी |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मावस दाजीचे शेतातील खदाणीचा व पिकांचा पंचनामा करण्यासाठी |
| लाच मागणी ठिकाण | :- | हान्फीस मोबाईल सेटर, प्रोझोन मॉल समोर, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार तक्रारदार यांचे मावस दाजी व त्यांची मुलगी यांच्या मालकीचे जमीनीतील खदानीचा व पिकाचा पंचनामा करून त्याचा अहवाल तहसीलदार यांना सादर करणेसाठी अप्पासाहेब गोराडे, मंडळ अधिकारी, चिकलठाणा, औरंगाबाद हे ५०,०००/- रु लाचेची मागणी करिता असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, अप्पासाहेब गोराडे, मंडळ अधिकारी, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत:साठी २५०००/- रुपये व तलाठी यांच्यासाठी २५०००/- रु असे एकुण ५०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी श्री. अप्पासाहेब मुरलीधर गोराडे, पद- मंडळ अधिकारी, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५००००/- रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार सुनिल पाटील, विजय बाम्हदे, मिलींद इपर, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

16.2.21.

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.